-: प्रकरण सहावे :-

# सारांश आणि निष्कर्ष

(Summary And Conclusions)

## ◉ प्रकरण सहावे ◉

# सारांश आणि निष्कर्ष

(Summary and Conclusions)

**'सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास : वारणानगरमधील सहकारी संस्थांचा समाजशास्त्रीय अभ्यास'** हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. या संशोधन अहवालाची विभागणी खालील पाच प्रकरणांमध्ये केली आहे.

१) प्रस्तावना

२) वारणा सहकारी संकुल

३) संशोधन समस्या आणि संशोधनाचा परिचय

४) वारणानगरमधील महिला सहकारी संस्थांचा परिचय

५) सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास

**प्रकरण पहिले :-**

या प्रकरणामध्ये पहिल्या भागात 'सहकार' या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करण्यात आलेला आहे. मेहता व्ही. एल., डॉ. के. सी. आर्, टिशलर, व्हायटन आणि हंटर, ड्रेसलर आणि विल्स, डेव्हीड सील्स, एच्. एफ. रिडींग, डब्ल्यू. पी. वॅटकीन या मान्यवर विचारवंतांनी केलेल्या सहकाराचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या कांही व्याख्यांचा परामर्श या भागात दिलेला आहे.

वरील सर्व मान्यवरांच्या व्याख्यांवरून सहकाराच्या संकल्पनेत खालील अर्थछटा समाविष्ट आहेत असे दिसून येते. सहकार हे सामाजिक आंतरक्रियेचे रूप आहे. सहकारामध्ये दोन किंवा अधिक व्यक्तिंची आतंरक्रियात्मक साखळी निर्माण झालेली असते. एखादे समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रितपणे किंवा सामुहिकरित्या कार्यरत राहतात. सर्वांचे उद्दिष्ट समान असते. पण जेंव्हा त्यापैकी कोणत्याही एका व्यक्तिला स्वतंत्रपणे प्रयत्न करून ते साध्य करता येत नाही तेंव्हा सहकार्याचा मार्ग अवलंबिला जातो.

या प्रकरणातील दुसऱ्या भागात सहकारी चळवळीचा उदय आणि विकासाचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. सर्वप्रथम इंग्लंडमध्ये सन १८४४ मध्ये सहकारी चळवळीचा उदय झाला. इंग्लंडमधील 'रॉशडेल' या गावातील ४८ विणकाम कामगारांनी रॉशडेल सोसायटीची स्थापना केली हीच सहकार चळवळीची गंगोत्री मानली जाते. स्वत:चे जवळचे अल्प आर्थिक बळ, एकमेकांवरच्या विश्वास आणि जीवनमान उंचावण्यासाठी लागणारी धडपड या त्रिसूत्रींच्या बळावर रॉशडेल सोसायटीतील कामगारांनी अत्यंत चांगले आणि यशस्वी काम केले.

भारतीय सहकारी चळवळीची सुरूवात २५ मार्च १९०४ रोजी संमत केलेल्या कायद्याने झाली. सहकारी संस्था कायदा १९०४ हा भारतीय सहकारी चळवळीच्या विकासातील एक महत्त्वाची घटना आहे. सहकारी चळवळीच्या विकासाची ही प्रायोगिक अवस्था मानली जाते. या विकासाच्या अवस्थेचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्राथमिक सहकारी पतपुरवठा करण्यावर अधिक भर देण्यात आला.

वाढत्या सहकारी संस्थांच्या संख्येबरोबर हा कायदा अपुरा वाटू लागला. कारण या कायद्याने फक्त कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांनाच परवानगी दिली होती. त्यामुळे इतर प्रकारच्या सहकारी संस्थांचा विकास होऊ शकला नाही. तसेच सर्व पुरवठा करणाऱ्या संस्थांनाच परवानगी दिली होती. त्यामुळे इतर प्रकारच्या सहकारी संस्थांचा विकास होऊ शकला नाही. तसेच कर्ज पुरवठा

करणाऱ्या संस्थांनाच आर्थिक मदत करण्याकरिता काही मध्यवर्ती सहकारी संस्थांची स्थापना करण्याची तरतुद या कायद्यामध्ये नव्हती. या प्रकारचे दोष व उणिवा लक्षात घेऊन सहकारी कायद्यात दुरूस्ती करण्याची आवश्यकता होती. तेंव्हा सन १९१२ मध्ये नवीन सहकारी कायदा करण्यात आला. या नवीन कायद्यामुळे भारतातील सहकारी चळवळीस उत्तेजन मिळाले. त्यामुळे सहकारी चळवळीचा नवा टप्पा सुरू झाला.

यानंतरच्या तिसऱ्या भागात 'महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा' आढावा घेतला आहे. महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातच सहकारी चळवळीची सुरूवात झाली आहे. इ. स. १८८९ मध्ये बडोदा शहरात मध्यम वर्गीय महाराष्ट्रीयन लोकांनी सुरू केलेली अन्योन्य मंडळी ही संस्था भारतातील पहिली सहकारी संस्था होय. इ. स. १९२५ मध्ये मुंबई सहकारी संस्था कायदा संमत करण्यात आला. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात झालेली सहकारी चळवळीची प्रगती नेत्रदीपक आहे. महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळ व्यापक ठरावी म्हणून १९६० मध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा संमत करण्यात आला. इ. स. १९८६ मध्ये या कायद्यात दुरूस्त्या करण्यात आल्या व ६८ कलमांमध्ये सुधारणा करून त्यात अनेक नवीन पोटकलम वाढविण्यात आली.

महाराष्ट्रात विविध प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वात आहेत. त्यात प्रामुख्याने सहकारी साखर कारखाने, सहकारी कृषि पतपुरवठा संस्था, सहकारी दुग्ध योजना, ग्राहक सहकारी संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी खरेदी-विक्री संस्था, सहकारी मत्स्य व्यवसाय संस्था, मजूरांच्या सहकारी संस्था, विणकर सहकारी संस्था, सहकारी सुतगिरणी, वनश्रमिक सहकारी संस्था, जंगल कामगार सहकारी संस्था, आदिवासी विकास सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, भातगिरण्या, तेलगिरण्या, कुक्कुटपालन संस्था, रेशीम व छपाई उद्योग, प्रक्रिया संस्था, शेती सोसायट्या, उपसा जलसिंचन योजना, वाहतूक संस्था, चित्रपट संस्था, पगारदार नोकरांच्या सहकारी संस्था आदींचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने राज्याच्या विशेषत: ग्रामीण भागाच्या सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतीक विकासामध्ये महत्त्वाची आणि प्रभावी भूमिका बजावली आहे. त्यामुळे ग्रामीण जनतेच्या राहणीमानात लक्षणीय बदल घडून आले आहेत. महाराष्ट्रामध्ये विशेषत: ग्रामीण तसेच शहरी भागाच्या सामाजिक, आर्थिक विकास करण्यासाठी शिखर व मध्यवर्ती पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक, अपेक्स को-ऑप. बँक, अर्बन बँक्स ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा लि. मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ, प्राथमिक कृषी पुरवठा संस्था, बिगर कृषी पत-पुरवठा संस्था, सहकारी पणन संस्था, कापूस एकाधिकार खरेदी योजना, सहकारी सुत गिरणी, सहकारी हातमाग संस्था, प्राथमिक सहकारी दूध संस्था, सहकारी मत्स्य व्यवसाय संस्था, कुक्कुट विकास सहकारी संस्था, समाजसेवी व इतर सहकारी संस्था कार्य करीत आहेत.

राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची एकत्रित संख्या दि. ३१ मार्च २००० अखेर १,५२,६१९ इतकी होती. ४ कोटी १४ लाख सभासद, ४,५६० कोटी रूपयांचे भागभांडवल, ३५,३११ कोटी रूपयांच्या ठेवी, ७०,५०१ कोटी रूपयांचे खेळते भांडवल अशी राज्यातील सहकारी संस्थांची आकडेवारी आहे.

या प्रकरणाच्या ४ थ्या भागात कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा आढावा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्यात कोल्हापूर जिल्हा हा देखील सहकारी चळवळीच्या यशाबद्दल प्रसिद्ध आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १२ तालुक्यांमध्ये सहकारी चळवळ फोफावलेली दिसून येत आहे.

**<u>प्रकरण दुसरे</u> :-**

'वारणा सहकारी संकुल : परिचय' या शीर्षकाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये वारणानगरमधील सहकारी संस्थांचा परिचय करून घेण्यात आलेला आहे. सन १९५० पर्यंत वारणा

परिसर हा ओसाड, निर्जन माळ होता. या ठिकाणी फक्त शेळ्या-मेंढ्या, कोल्ह्या-कुत्र्यांचा वावर होता. दिवसा देखील चोर-दरोडेखोर लुटमारी करत होते. पण आज हा परिसर संपूर्ण बदललेला आहे. या सर्व बदलांचे प्रवर्तक ते म्हणजे सहकारमहर्षी कै. मा. विश्वनाथ आण्णा उर्फ तात्यासाहेब कोरे.

कै. तात्यासाहेब कोरे यांनी आपल्या अफाट कर्तृत्त्वाने वारणा खोऱ्याचा चेहरा मोहराच बदलून टाकलेला आहे. वारणा खोऱ्यातील विविध सहकारी संस्थाद्वारा ग्रामीण भागात प्रचंड विकास कार्य उभे केलेले आहे.

या प्रकरणामध्ये वारणानगर येथील श्री. तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना तसेच वारणा कारखान्याने सुरू केलेले अन्य प्रकल्प - वारणा डिस्टलरी, वारणा कागद प्रकल्प, विद्युत प्रकल्प, वारणा बायोअर्थ, कामगार कल्याण, कृषी विकास, पाणी पुरवठा योजना, सार्वजनिक सेवा (वाचनालयांना मदत, शारिरीक शिक्षणाच्या योजना, गोबर गॅस योजना, सार्वजनिक विवाह सोहळा, कुटूंब नियोजनासाठी प्रयत्न, मागासवर्गीयांचे जीवन उंचावण्यासाठी विविध योजना, वैद्यकीय सेवा) इ. अनेक प्रकल्प कारखान्याअंतर्गत सुरू केले आहेत.

श्री वारणा सहकारी साखर कारखान्याशी संलग्न असणाऱ्या वारणानगरमधील सहकारी संस्थांमध्ये श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि., तात्यासाहेब कोरेनगर (वारणा दूध संघ) तसेच वारणा दूध संघाशी संलग्न असलेल्या संस्थांमध्ये अमृतसेवक सहकारी पतसंस्था, अमृत कामगार कल्याण मंडळ, तात्यासाहेब कोरे सहकारी दूध-साखर वाहतूक संस्था मर्यादित, वारणानगर, अमृत भगिनी मंडळ, सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्था, माल्टेड फूड फॅक्टरी, सह्याद्री कुक्कुटपालन सहकारी संस्था, तात्यासाहेब कोरे वारणा कोंबडी सहकारी संघ या सहकारी संस्थाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर, श्री वारणा ॲग्रीकलचरल गुडस् प्रोसेसिंग को-ऑप. सोसायटी लि., वारणानगर (वॅप्कॉस), वारणा वायर्ड व्हिलेज प्रोजेक्ट, वारणा विभाग शिक्षण मंडळ, या वारणा विभाग शिक्षण मंडळा अंतर्गत विविध

शिक्षण संस्थांमध्ये श्री वारणा महाविद्यालय, वारणा विद्यामंदिर, श्री वारणा शिशुविहार, श्री वारणा विद्यालय, श्री वारणा बालवाद्यवृंद, तंत्र शिक्षण संस्था, (तात्यासाहेब कोरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वारणानगर, तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर, तात्यासाहेब कोरे ट्रेनिंग कम प्रॉडक्शन सेंटर, वारणानगर) तात्यासाहेब कोरे इंग्लिश अॅकॅडमी, तात्यासाहेब कोरे मिलीटरी अॅकॅडमी या शिक्षण संस्थेचा समावेश करण्यात आलेला आहे. या सहकारी संस्थांचा परिचय करून देण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे :-**

'संशोधन समस्या आणि संशोधनाचा आराखडा' या तिसऱ्या प्रकरणाची संशोधकाने प्रस्तुत अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन करण्यात आले आहे.

संशोधन विषयाची निवड, संशोधनासाठी निवडलेल्या समस्या, संशोधनाची उद्दीष्टे, संशोधन क्षेत्र, नमुना निवडीची पद्धत, तथ्य संकलनासाठी वापरलेले तंत्र, तथ्य संकलन, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण आणि प्रकरणांची रूपरेषा या संशोधन आराखड्याच्या विविध पैलूंचे विवेचन या प्रकरणात केलेले आहे.

संशोधन समस्या यामध्ये 'सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास : वारणानगरमधील सहकारी संस्थांचा समाजशास्त्रीय अभ्यास' असा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. प्रस्तुत संशाधनाठी खालील उद्दीष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) वारणानगरमधील महिला सहकारी संस्थांचा परिचय करून घेणे.

२) महिला सहकारी संस्थांमधील स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.

३) महिला सहकारी संस्थांमुळे स्त्रियांच्या आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

४) महिला सहकारी संस्थांमुळे महिलांच्या सामाजिक जीवनात झालेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

सदचे संशोधन करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील वारणानगर हे ठिकाण हे निवडले आहे. याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१) वारणानगर हे कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे एक प्रमुख केंद्र आहे. याठिकाणी वारणा सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून विविध सहकारी संस्था उदयास आल्या आहेत.

२) वारणानगर या ठिकाणी महिलांच्या सहकारी संस्था आहेत.

३) संशोधक हा वारणानगर जवळील कोडोली या गावचा कायमचा रहिवाशी असल्यामुळे संशोधकास त्या संपूर्ण परिसराची चांगली माहिती आहे.

४) तसेच येथील सहकारी क्षेत्रातील अनेकांशी संशोधकाच्या ओळखी आहेत. त्यामुळे संशोधनासाठी माहिती संकलित करणे सोईचे होईल.

वरील चार बाबी लक्षात घेऊन वारणानगर हे अभ्यासक्षेत्र निवडण्यात आले.

या परिसरातील सर्व सहकारी संस्थांमुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे महिलांच्या सामाजिक-आर्थिक दर्जात परिवर्तन होत आहे. हे खरे असले तरी प्रस्तुत अभ्यासासाठी केवळ महिला सहकारी संस्थांची निवड करण्याचे ठरले. त्यानुसार या संशोधनासाठी वारणानगरमधील खालील महिला सहकारी संस्थांची निवड केलेली आहे.

अ) श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर.

ब) श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर.

क) श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर.

ड) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा बझार).

वरील संस्थांची अभ्यासासाठी निवड करण्याचे कारण असे की, या संस्था प्रामुख्याने महिलांच्या सहकारी संस्था आहेत. हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

१) श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर या संस्थेत केवळ ३ पुरूष वगळता सर्व महिला आहेत.

२) श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर या संस्थेत व्यवस्थापन मंडळात तसेच कर्मचारी वर्गात सर्वच महिला आहेत.

३) श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेत तीन पुरूष कर्मचारी वगळता अन्य सर्व महिला आहेत.

४) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ, वारणानगर (वारणा बझार) या संस्थेत ८०% महिला सभासद आहेत. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांमध्ये देखील ८०% पेक्षा जास्त महिला कर्मचारी आहेत.

सदर संशोधनासाठी महिलांच्या सहकारी संस्थांची निवड केल्यानंतर ज्यांच्याकडून प्राथमिक माहिती संकलित करावयाची होती अशा महिलांची निवड करण्यासाठी पुढील पद्धती वापरली. प्रथम निवडलेल्या महिला सहकारी संस्थांच्या कार्यालयांना भेटी दिल्या. सदर त्या-त्या संस्थेतील स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे याविषयीची माहिती संकलित केली. निवडलेल्या सहकारी संस्थेतील श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर या संस्थेत एकूण ३४१ महिला कर्मचारी आहेत. त्यापैकी ५० महिलांची, श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर या संस्थेत एकूण २१ महिला कर्मचारी आहेत त्यापैकी १२ महिलांची, श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेतील एकूण ७ महिला कर्मचाऱ्यांपैकी ५ महिलांची, तसेच श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि.

वारणानगर (वारणा बझार) या संस्थेतील ६१ महिला कर्मचाऱ्यांपैकी ३३ महिला कर्मचाऱ्यांची निवड केली.

वरील सर्व संस्थांमधील महिलांचे प्रतिनिधीत्व नमुन्यात असावे असे ठरविण्यात आले. संशोधकाजवळ उपलब्ध असणारी वेळ, श्रम आणि पैसा या स्वरूपातील साधन सामुग्री लक्षात घेऊन या सर्व संस्थांमधील १०० महिला उत्तरदात्यांची निवड सहेतूक नमुना निवड या तंत्राचा अवलंब करण्याचे ठरविले. त्यानुसार सहेतूक नमुना निवड पद्धतीने १०० उत्तरदात्या महिलांची निवड केली.

अभ्यासासाठीची उद्दीष्टे लक्षात घेऊन तथ्य संकलन करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली. वरीलपैकी प्रत्येक संस्थेतील चार-चार कर्मचाऱ्यांची मुलाखत घेऊन अनुसूचीची पूर्वचाचणी घेण्यात आली. योग्य त्या दुरूस्त्या करून मुलाखत अनुसूचीत काही बदल करण्यात आले आणि अंतिम मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली. संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील सर्व महिला संस्थांकडून सदर मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संशोधकाने स्वत: मुलाखती घेऊन माहिती संकलित केलेली आहे. तथ्य संकलनाचे काम १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २००० या कालावधीत करण्यात आले.

संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करून सारण्या तयार करण्यात आल्या. सदर सारणीतील वर्गीकृत माहितीच्या आधारे निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत.

**प्रकरण चौथे :-**

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनासाठी ज्या महिला सहकारी संस्थांमधून उत्तरदात्या महिलांची निवड करण्यात आली होती त्या खालील संस्थांचा थोडक्यात परिचय करून देण्यात आलेला आहे.

१) श्री वारणा महिला गृहोद्योग लिज्जत पापड केंद्र, वारणानगर.

२) श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर.

३) श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर.

४) श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा बझार).

या संस्थांमधील अनुक्रमे ५०, १२, ५, ३३ महिला उत्तरदात्यांची अभ्यासासाठी संशोधकाने निवड केलेली आहे. (एकूण १०० महिला उत्तरदात्यांची निवड केलेली आहे.)

**<u>प्रकरण पाचवे</u> :-**

'सहकारी संस्था आणि स्त्रियांचा विकास' या पाचव्या प्रकरणात निवडलेल्या नमुन्यातील १०० महिला उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे सहकारी संस्था स्त्रियांच्या विकासात कोणती भूमिका पार पाडतात हे समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या प्रकरणात तीन स्थूल विभाग करण्यात आलेले आहेत. पहिल्या विभागात उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन केलेले आहे. दुसऱ्या विभागात उत्तरदात्यांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती कशी आहे याविषयीचे विवेचन केले आहे. तर तिसऱ्या विभागात सहकारी संस्थांमुळे स्त्रियांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा कसा बदलला आहे याविषयीच्या उत्तरदात्यांच्या प्रतिक्रियांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

या प्रकरणातील सहकारी संस्थांमधील महिलांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी विषयीच्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुतांशी महिला (५१%) या वारणानगर याठिकाणी राहणाऱ्या आहेत. तर उर्वरित महिला ह्या वारणानगरच्या आसपासच्या गावातून वारणानगर येथील

सहकारी संस्थात काम करण्यास येत आहेत. सहकारी संस्थांमुळे केवळ वारणानगरमधील महिलांचाच नव्हे तर आजुबाजूच्या खेड्यामधील महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

महिलांच्या सहकारी संस्थांत तरूण वयोगटातील महिला संख्येने सर्वात जास्त (६०%) आहेत. त्याखालोखाल मध्यम वयोगटातील महिला (३५%) आहेत तर प्रौढ वयोगटातील महिला अत्यल्प (५%) आहेत. ६% महिलांचा अपवाद वगळता उर्वरित सर्व विवाहित महिलांचाच (९४%) भरणा सहकारी संस्थांमध्ये आहे. उत्तरदात्या महिलांच्या कुटुंब प्रकारात विभक्त कुटुंबाची पार्श्वभूमी असणाऱ्या महिला संख्येने सर्वाधिक (५३%) आहेत. सर्वाधिक उत्तरदाते आकाराने 'लहान' (२ ते ५ सदस्य) कुटूंबातील (६२%) असून त्याखालोखाल 'मध्यम' (६ ते ८ सदस्य) असणाऱ्या कुटूंबातील (३३%) आहेत. तर केवळ ५% उत्तरदाते सापेक्षत: 'मोठ्या' (९ ते १२ सदस्य) असणाऱ्या कुटूंबातील आहेत.

उत्तरदात्या महिलांमध्ये मराठा जातीच्या स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक (६२%), त्याखालोखाल ब्राह्मण (८%), लिंगायत-वाणी (७%), मांग (७%), महार (३%), नामदेव शिंपी (३%), चांभार (१%), ख्रिश्चन (३%), मुस्लिम (२%), धनगर (१%) या जातीच्या महिलांचा समावेश झालेला आहे. उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक प्रमाणात हिंदू धर्मीय स्त्रिया (९५%) आहेत. तर त्याखालोखाल ख्रिश्चन धर्मीय (३%) व मुस्लिम धर्मीय (२%) स्त्रिया या संस्थांमध्ये नोकरी करीत आहेत.

शैक्षणिक पात्रतेचा विचार करता सहकारी संस्थांमध्ये अगदी अशिक्षित स्त्रियांपासून ते पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना अर्थार्जनाची संधी उपलब्ध झालेली आहे. ८६% महिला ह्या सुशिक्षित आहेत तर १४% महिला ह्या निरक्षर आहेत. बहुतांशी महिला ह्या १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या (३०%) आहेत. उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सरासरी वार्षिक उत्पन्न पाहिले तर बहुसंख्य (७५%) उत्तरदात्यांचे वार्षिक उत्पन्न रूपये २०,००१ ते ५०,००० या गटातील (७५%) आहे.

त्याखालोखाल रूपये २०,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे (१४%) उत्तरदाते आहेत. तर रूपये ५०,००१ ते १,००,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे (११%) उत्तरदाते आहेत. यावरून असे दिसून येते की, केवळ एकाच उत्तरदात्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रूपये ११,००० पेक्षा कमी आहे.

पाचव्या प्रकरणातील दुसऱ्या विभागामध्ये उत्तरदात्याच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती कशी आहे ? याविषयीचे विवेचन आहे. संकलित केलेल्या या महिला वरील संस्थांत वेगवेगळ्या विभागात काम करीत आहेत. उत्तरदात्या महिलांची नोकरी भरतीचे स्वरूप पाहिले तर असे दिसून येते की, या चार सहकारी संस्थांमध्ये नोकरी/मजूरी मिळालेल्या महिलांपैकी सर्वाधिक महिला (६२%) ह्या त्यांचे पती वारणानगर मधील वेगवेगळ्या उद्योग समुहामध्ये नोकरीस असल्यामुळे तसेच त्यांची चेअरमनसाहेबांशी ओळख असल्यामुळे नोकरीस लागलेल्या आहेत. त्याखालोखाल (२५%) महिलांना पूर्वीच्या कामाच्या अनुभवावरून या सहकारी संस्थेत नोकरी मिळाली. तसेच (६%) महिला या विक्रेता परीक्षण कोर्स प्रथम क्रमांकामध्ये पास होऊन त्यांना नोकरीची संधी मिळाली आहे. व उर्वरित (६%) महिलांना त्यांची शैक्षणिक पात्रता पाहून व मुलाखत घेऊन रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

उत्तरदात्या महिलांपैकी सर्वाधिक महिला (५६%) या रोजंदारी कर्मचारी आहेत. तर त्या खालोखाल (४४%) महिला या कायमस्वरूपी नोकरीस आहेत. रोजंदारीवर काम करणाऱ्या महिला ह्या सर्वाधिक (५६%) या पापड केंद्रामधील आहेत. तर कायमस्वरूपी नोकरीस असणाऱ्या महिला (४४%) ह्या श्री वारणा भगिनी मंडळ, वारणानगर, श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था लि., वारणानगर, श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर (वारणा बझार) या तीन संस्थांमध्ये काम करणाऱ्या आहेत.

उत्तरदात्या महिलांच्या मासिक मिळकतीचा विचार केला तर पापड केंद्रामध्ये काम करणाऱ्या महिलांना प्रत्येक महिन्यास रूपये १,२०० ते १,८०० पर्यंत मजूरी मिळते. तसेच श्री वारणा

भगिनी मंडळ, श्री वारणा महिला सहकारी पतसंस्था, श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ (वारणा बझार) या ठिकाणच्या महिला कर्मचाऱ्यांना रू. ८५०- रू.३,७०० पर्यंत मासिक पगार मिळतो. ३६ महिला वगळता उर्वीरत सर्व महिलांना (६४%) ५ वर्षाहून अधिक काळ या सहकारी संस्थांमधील कामाचा अनुभव आहे.

उत्तरदात्या महिलांचे कामाचे स्वरूप पाहिले तर चारही संस्थांमधील महिलांचे कामाचे स्वरूप हे वेगवेगळे असल्याचे दिसून येते. चारही संस्थांच्या कामाच्या वेळेचा अभ्यास करताना संशोधकाला असे दिसून आले आहे की, श्री वारणा गृहउद्योग लिज्जत पापड केंद्राची कामाची वेळ ही पहाटे ५.०० पासून ते सकाळी ९.०० पर्यंत आहे, श्री वारणा भगिनी मंडळाची कामाची वेळ ही सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत आहे. श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेची कामाची वेळ ही सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत आहे, तर वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळाची (वारणा बझार) या संस्थेची कामाची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत आहे. १०० महिला उत्तरदात्यांपैकी केवळ १०% महिला उत्तरदात्यांना कामाची वेळ व तास योग्य वाटत नाहीत.

उत्तरदात्या महिलांच्या पगाराव्यतिरिक्त मिळणाऱ्या अन्य सेवा-सुविधा पाहिल्या असता असे आढळून आले आहे की, पापड केंद्रामध्ये काम करीत असणाऱ्या महिलांना वर्षभरात केलेल्या पापडावरती म्हणजे जेवढे जास्त किलोचे पापड लाटले जातात त्याच्यावरती 'बक्षिस' दिले जाते. परगावाहून पापड घालण्यास येणाऱ्या महिलांना पापड केंद्रापर्यंत येण्या-जाण्यासाठी केंद्रमार्फत मोफत बससेवा आहे. तसेच वर्षातून एकवेळा सर्व महिलांची आरोग्याची मोफत तपासणी केली जाते. श्री वारणा महिला सहकारी पतसंस्थेमधील महिला कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या वेळेस बोनस दिला जातो व नियमाप्रमाणे रजा व आठवड्याची सुट्टी दिली जाते. वारणा बझारमधील महिला कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या वेळेस बोनस व ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात बक्षिस दिले जाते. जादा मासिक विक्रीवर इनसेंटीव्ह दिला जातो. व क्रेडिट कार्डची सुविधा आहे.

या चारही संस्थांमधील वेतनाच्या बाबतीत पाहिले असता असे दिसून येते की, या ठिकाणी काम करणाऱ्या स्त्री व पुरूष यांना त्यांच्या नोकरीचा कालावधी व कामाचे स्वरूप यावरून पगार निश्चित करण्यात आलेला आहे. स्त्री व पुरूष यांच्या पगारात कोणत्याही प्रकारचा भेदभाव केलेला नाही.

या प्रकरणातील तिसऱ्या भागामध्ये नोकरीच्या संधीमुळे उत्तरदात्या महिलांचा आर्थिक आणि सामाजिक विकास कशा पद्धतीने झाला आहे याचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. सहकारी संस्थांमधील नोकरीमुळे उत्तरदात्यांमधील ४६% महिलांनी कुटुंबातील आवश्यक गरजा त्या नोकरीच्या मिळालेल्या पैशातून भागतात असे सांगितले. तसेच ४७% महिलांच्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा ह्या काही प्रमाणात भागण्यास मदत होते तर उर्वरित ७% महिलांच्या कुटूंबाच्या आवश्यक गरजा ह्या अत्यल्प प्रमाणात भागतात असे महिला उत्तरदात्यांनी सांगितले. नोकरी मिळाल्यामुळे स्वत:च्या कुटूंबाला समाजात मानाचे, प्रतिष्ठेचे स्थान मिळाले आहे असे महिलांना वाटते. समाजातील त्या कुटूंबाचा दर्जा सुधारलेला आहे असेही महिलांन वाटते. नोकरीतून मिळणाऱ्या पैशाचा वापर करण्याचे आर्थिक स्वातंत्र्य असल्याचे मुलाखतीतून त्यांनी सांगितले आहे. मात्र नोकरीतून मिळालेल्या मिळकतीचा वापर फारच थोड्या महिला स्वत:च्या व्यक्तिगत गरजांच्या पुर्ततेसाठी करतात. याउलट बहुतांशी महिला उत्तरदात्या आपल्या मिळकतीचा वापर कौटुंबिक कारणासाठीच करतात.

नोकरीच्या संधीमुळे महिलांच्या सामाजिक प्रतिष्ठेत वाढ झाली आहे असे सर्व महिला उत्तरदात्यांनी सांगितले. आर्थिक स्वावलंबनामुळे स्वत:चा कुटूंबातील दर्जा बदलला आहे असे ७७ महिला उत्तरदात्यांनी सांगितले. तर उर्वरित २३ महिला उत्तरदात्यांनी त्यांच्या कुटूंबाच्या वैयक्तिक दर्जामध्ये फारसा फरक पडल्याचे जाणवत नाही असे सांगितले. सर्वच उत्तरदात्यांनी (१००%) नोकरी लागल्यापूर्वीचे राहणीमान व नोकरी लागल्यानंतरचे राहणीमान यामध्ये अनेक बाबतीत बदल झाला आहे असे सांगितले आहे. नोकरी करणाऱ्या महिलांच्या घरकामावर नोकरी करण्यामुळे काही प्रमाणात

का होईना परिणाम होत असल्याचे सांगितले आहे. त्यांच्यावर कामाचा अधिक ताण पडतो तसेच नोकरी करण्यामुळे महिलांच्या बाबतीत पती अथवा अन्य कुटूंबातील सर्वांच्या प्रतिक्रिया चांगल्या असल्याचे (१००%) महिलांनी सांगितले आहे.

सहकारी संस्थांमधील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होता आल्यामुळे बाहेरील विश्वात इतरत्र काय चालले आहे याची महिलांना जाणीव होते. तसेच अशा कार्यक्रमांमुळे सर्वसाधारण जाणीव पातळी उंचावलेली आहे अशी महिलांची भावना आहे.

सहकारी संस्थातील सहभागामूळे महिलांमध्ये आणि त्यांच्या कुटूंबामध्ये अनेक बदल घडून आलेले आहेत. यामध्ये महिलांचे स्वत:चे तसेच कुटूंबाचे राहणीमान सुधारले आहे. सर्वांना वेळेचे महत्त्व पटले आहे. स्वत:च्या उपलब्ध वेळेचे त्या नियोजन करू लागल्या आहेत. आरोग्याची स्वच्छता, टापटीपपणा, पैशाचा योग्य तो वापर इत्यादींचे महत्त्व, स्वावलंबी जीवन जगण्याचे महत्त्व या सर्व महिलांना पटले आहे. उत्तरदात्या महिलांच्या मुलाखतीतून असे सूचित होते की, सहकारी संस्थांमधील सहभागामूळे महिलांमध्ये काही महत्त्वाचे बदल घडून आलेले आहेत. नोकरीतून मिळालेल्या पैशातून महिलांनी स्वत:साठी तसेच कुटूंबातील सर्व लोकांना लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंची खरेदी केलेली आहे. यामध्ये घरामध्ये टि. व्ही. रेडिओ, सायकल, फ्रिज, वॉशिंग मशीन, टेबल फॅन, मोटर सायकल, कपाटे, भांडी, भांड्यांची कपाटे, सोन्याचे दाग-दागिने इ. खरेदी केलेले आहे. याशिवाय नोकरीतून मिळालेल्या पैशातून मुलां-मुलींचे विवाह, त्यांचे उच्च शिक्षण इ. साठी पैशाचा वापर केलेला आहे.

तसेच काही महिलांनी नोकरीच्या पैशातून बचतीची योजन चालू केली आहे. तसेच काही महिलांनी आपल्या बचतीवर कर्ज घेऊन घर बांधणी साठी जागा, फ्लॅट तसेच घर दुरूस्तीसाठी, घर बांधणीसाठी पैशाचा वापर केलेला आहे. याची परतफेड त्यांना मिळणाऱ्या पगारातून केलेली आहे. याशिवाय मिळालेल्या नोकरीच्या पैशातून महिलांनी चटणी कांडप मशिन, शेवया मशिन घरगुती वह्या-पुस्तके बायंडिंग व्यवसाय, जनावरांची खरेदी केलेली आहे.

एकंदरीत वरील विश्लेषणावरून असे दिसून येते की, महिलांना मिळालेल्या या नोकरीच्या संधीमुळे त्यांचे स्वत:चे जीवन तर स्वावलंबी झालेले आहेच. याशिवाय त्यांच्या कुटूंबाला नोकरीमुळे फार मोठा मदतीचा हातभार लागलेला आहे.

मुलाखत पत्रिकेच्या सहाय्याने संकलित केलेल्या माहितीचे वर्गिकरण आणि विश्लेषण वरील तीन विभागात करण्यात आलेले आहे. त्यावरून सहकारी संस्थांमुळे या संस्थेत नोकरी/मजूरी करणाऱ्या महिलांच्या व्यक्तिगत जीवनात, त्यांच्या वागण्या-बोलण्यात, त्यांच्या कुटूंबाच्या आर्थिक दर्जात आणि सामाजिक प्रतिष्ठेत बदल घडून आला आहे हे स्पष्ट होते.

या महिलांचा त्यांच्या कुटूंबातील दर्जाही सुधारला आहे अशी त्यांची भावना आहे. व्यापक समाजव्यवस्थेच्या दृष्टीने विचार करता सहकारी संस्थांनी महिलांना अर्थव्यवस्थेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. यामुळे आर्थिक विकासात महिलांचे योगदान मिळणे शक्य झाले आहे. महिलांच्या दृष्टीने विचार करता सहकारी संस्थांमुळे महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण होण्यास मदत झाली आहे.

याशिवाय सहकारी संस्थांमध्ये सहभागी झाल्यामुळे लोकशाही व्यवस्थेतील मूल्ये महिलांमध्ये बिंबवणे शक्य झाले आहे. परस्परांचा आदर राखणे, परस्परांना सहकार्य करणे, नागरी जीवनातील नियम पाळणे आदी गोष्टी आत्मसात करणे सहकारी संस्थातील सहभागामुळे महिलांना शक्य झाल्या आहेत. साकल्याने विचार करता सहकारी संस्थांमधील सहभागामुळे स्त्रियांमध्ये वैचारिक विवेकीकरणाच्या प्रक्रियेला (Rationalisation of thinking process) चालना मिळाली.

सहकारी संस्था म्हणजे स्त्रियांच्या स्वयंसहभागातून त्यांचे आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण घडवून आणणारी साधने आहेत असे म्हणता येईल.

*****